**महाराष्ट्र शासन,**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
राज्यस्तरीय निवड समिती, मुंबई
सेंट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, छत्रपती शिवाजी
महाराज टर्मिनस जवळ, मुंबई-४०० ००१
फोन नं. ०२२-२२६२३३८०
ई-मेल:- tca.selectioncommittee@gmail.com

महाराष्ट्र शासनाच्या, सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील विविध कार्यालयातील खालील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील ३९ पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन पद्धतीने दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ ते ५ सप्टेंबर, २०२३ या कालावधीत https://ibpsonline.ibps.in/dambcdjun23/ या संकेतस्थळावर आवेदन अर्ज मागविण्यात येत आहे. सविस्तर जाहिरातीचे तपशिल 1) https://mahaarchaeology.in/ 2) http://www.maharashtra-archives.org 3) https://www.mahasanskruti.org/ 4) https://www.mahasahitya.org/ 5) www.gazetteers.maharashtra.gov.in 6) http://mahagazetteers.com या संकेतस्थळावर आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण २०२२/प्र.क्र.२१५/आस्थापना, दिनाक १४.१२.२०२२ अन्वये विभागाच्या विविध कार्यालयातील रिक्त पदे भरण्यासाठी राज्यस्तरीय निवड समिती गठीत करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२, दि. २१.११.२०२२ व दि.१४.०२.२०२३ मधील तरतुदीनूसार सदर भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर पदांकरिता पात्र असणारे महाराष्ट्र राज्यातील तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन- क्र.मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १० जुलै, २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारही अर्ज करू शकतील. ऑनलाईन परीक्षेची तारीख संकेतस्थळावर यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल.

२. प्रस्तुत परीक्षेमधून विविध संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या पदे, वेतन संरचना, सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे :-

**१. पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई**

| प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) सहायक अधिक्षक (गट-क) (एकुण पदे ०१) (वेतन श्रेणी :- S-१३:३५४००-११२४००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | | | | | | | | |
| (२) कनिष्ठ अभियंता (गट-क) (एकुण पदे ०१) (वेतन श्रेणी :- S-१४:३८६००-१२२८००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकुण पदे | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | | | | | | | | | |
| (३) जतन सहायक (गट-क) (एकुण पदे ०२) (वेतन श्रेणी :- S-१३:३५४००-११२४००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण पदे | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (४) तंत्र सहायक (गट-क) (एकुण पदे ०६)<br>(वेतन श्रेणी :- S-१३:३५४००-११२४००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| माजी सैनिक (१५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |
| एकुण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | २ | ६ |
| (५) मार्गदर्शक व्याख्याता (गट-क) (एकुण पदे ०१)<br>(वेतन श्रेणी :- S-६:१९९००-६३२००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | | | | | | | | |
| (६) उप आवेक्षक (गट-क) (एकुण पदे ०६)<br>(वेतन श्रेणी :- S-८:२५५००-८११००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ३ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| माजी सैनिक (१५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |
| एकुण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | २ | १ | २ | ६ |
| | | | | | | | | | | | |
| (७) छायाचित्रचालक (गट-क) (एकुण पदे ०१)<br>(वेतन श्रेणी :- S-१०:२९२००-९२३००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकुण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | | | | | | | | | |

२. पुराभिलेख संचालनालय, मुंबई

| प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (८) अभिलेखाधिकारी (गट-ब अराजपत्रित) (एकुण पदे ०१)<br>(वेतन श्रेणी :- S-१४:३८६००-१२२८००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकुण पदे | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | | | | | | | | | |
| (९) फार्शीज्ञात संकलक (गट-क) (एकुण पदे ०१)<br>(वेतन श्रेणी :- S-१३:३५४००-११२४००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | | | | | | | | |
| (१०) रसायनशास्त्रज्ञ (गट-क) (एकुण पदे ०१)<br>(वेतन श्रेणी :- S-१०:२९२००-९२३००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | | | | | | | | |

| प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (११) संशोधन सहायक (गट-क) (एकुण पदे ०१) (वेतन श्रेणी :- S-८:२५५००-८११००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकुण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | | | | | | | | | |
| (१२) संकलक (गट-क) (एकुण पदे ०२) (वेतन श्रेणी :- S-८:२५५००-८११००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | २ |
| एकुण | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | २ |
| | | | | | | | | | | | |
| (१३) सहायक छायाचित्रकार (गट-क) (एकुण पदे ०१) (वेतन श्रेणी :- S-८:२५५००-८११००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | | | | | | | | |
| (१४) ग्रंथालय लिपिक-नि-भांडारपाल (गट-क) (एकुण पदे ०१) (वेतन श्रेणी :- S-७:२१७००-६९१००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | | | | | | | | |
| (१५) अभिलेख परिचर (गट-क) (एकुण पदे ०१) (वेतन श्रेणी :- S-६:१९९००-६३२००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | | | | | | | | |
| (१६) तंत्रज्ञ मदतनीस (गट-क) (एकुण पदे ०१) (वेतन श्रेणी :- S-६:१९९००-६३२००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

३. सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई

| प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१७) अधिक्षक (गट-ब अराजपत्रित) (एकुण पदे ०२) (वेतन श्रेणी :- S-१३:३५४००-११२४००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| एकुण पदे | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | | | | | | | | | | | |
| (१८) सहायक (गट-क) (एकुण पदे ०२) (वेतन श्रेणी :- S-८:२५५००-८११००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| एकुण पदे | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |

### ४. दर्शनिका विभाग, मुंबई

| प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१९) सहायक संशोधन अधिकारी (गट-ब अराजपत्रित) (एकुण पदे ०४) (वेतन श्रेणी :- S-१४:३८६००-१२२८००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ३ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| एकुण पदे | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ४ |
| | | | | | | | | | | | |
| (२०) सहायक (गट-क) (एकुण पदे ०२) (वेतन श्रेणी :- S-८:२५५००-८११००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण पदे | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |

### ५. महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती साहित्य अकादमी, मुंबई

| प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (२१) टिप्पणी सहायक (गट-क) (एकुण पदे ०१) (वेतन श्रेणी :- S-८:२५५००-८११००) | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

३. प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

**४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

४.१. संवर्गातील पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. तसेच उपरोक्त पदांच्या पदनामामध्येही बदल होण्याची शक्यता आहे. याबाबत संबंधित विभागांच्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.२. पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास, याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.३. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे (महिला, दिव्यांग व्यक्ती, खेळाडू, अनाथ) उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणाऱ्या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल/वाढ होऊ शकते. सदर बदल झाल्यास, पदसंख्या/अतिरिक्त मागणीद्वारे प्राप्त संवर्गातील पदे परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

४.४. महिला खेळाडू तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.५. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. तसेच खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावर निवडीकरीता महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४.०५.२०२३ व यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.६. विमुक्त जाती (अ). मटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.७. अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले जातीचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असेल तर, याबाबतचे वैधता प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहुन संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

४.८. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.९. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : राआधी ४०१९/प्र.क्र. ३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.१०. अद्ययावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.११. सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

४.१२. अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.१३. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१४. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा/नियम/आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

४.१५. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.मकसी-१००७/ प्र.क्र.३६/ का.३६, दि. १० जुलै, २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवार संबंधित पदांच्या सेवा प्रवेश नियमातील सर्व अटींची पूर्तता करीत असल्यास ते उमेदवार त्या संबंधित पदांसाठी अर्ज करू शकतील. त्यासाठी संबंधित मराठी भाषिक उमेदवारांनी ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या

८६५ गावातीलच रहिवासी असल्याबाबतचा त्यांचा वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

४.१६. जाहिरातीस अनुसरुन अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी, ते वरीलपैकी एक, दोन किंवा सर्व संवर्गासाठी अर्ज करु इच्छित असल्यास, प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज व परीक्षा फिस Paid करणे आवश्यक राहील.

४.१७. सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

४.१८. महिला, खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अंशकालीन, दिव्यांग तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानूसार राहील.

४.१९. **खेळाडु आरक्षण:**-शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शुध्दीपत्रक क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च, २०१९ व शासन शुद्धिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: रानीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२०. प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

४.२१. खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४.२२. कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो. याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

४.२३. एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.२४. **दिव्यांग आरक्षण :**-दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२५. प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणाऱ्या संवर्ग/पदांच्या बाबतीत खालील पदांसमोर दर्शविलेल्या शारीरिक पात्रतेचे निकष धारण करणारे उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी पात्र अथवा अपात्र असतील.

| अ.क्र. | पदाचे नाव | शासन आदेश | दिव्यांगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|
| | पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई | | |
| (१) | सहायक अधिक्षक (गट-क) | शासन निर्णय क्रमांक:माहिती-२०२१/प्र.क्र.२६/सां.का.३, दि. २३.०२.२०२१ | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, OL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |

| | | | |
|---|---|---|---|
| (२) | कनिष्ठ अभियंता (गट-क) | शासन निर्णय क्रमांक:माहिती-२०२१/प्र.क्र.२६/सां.का.३, दि. २३.०२.२०२१ | a) D, HH<br>b) OA, OL, CP, LC, Dw,AAV<br>c) SLD, MI<br>d) MD Involving (a) to (c) above |
| (३) | जतन सहायक (गट-क) | शासन निर्णय क्रमांक:माहिती-२०२१/प्र.क्र.२६/सां.का.३, दि. २३.०२.२०२१ | a) D, HH<br>b) OA, BA, OL, CP, LC, Dw, AAV, Mdy<br>c) ASD (M), SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |
| (४) | तंत्र सहायक (गट-क) | शासन निर्णय क्रमांक:माहिती-२०२१/प्र.क्र.२६/सां.का.३, दि. २३.०२.२०२१ | a) D, HH<br>b) OA, OL, BL, CP, LC, DW, AAV<br>c) ASD (M), SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |
| (५) | मार्गदर्शक व्याख्याता (गट-क) | शासन निर्णय क्रमांक:माहिती-२०२१/प्र.क्र.२६/सां.का.३, दि. २३.०२.२०२१ | a) LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M, MoD), ID, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| (६) | उप आवेक्षक (गट-क) | शासन निर्णय क्रमांक:माहिती-२०२१/प्र.क्र.२६/सां.का.३, दि. २३.०२.२०२१ | a) LV<br>b) D, HH<br>c) OA, OL, CP, LC, Dw,AAV<br>d) ASD (M), ID, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| (७) | छायाचित्रचालक (गट-क) | शासन निर्णय क्रमांक:माहिती-२०२१/प्र.क्र.२६/सां.का.३, दि. २३.०२.२०२१ | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, OL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M, MoD), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| | पुराभिलेख संचालनालय, मुंबई | | |
| (८) | अभिलेखाधिकारी गट-ब (अराजपत्रित) | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) D, HH<br>b) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>c) ASD (M), SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |
| (९) | फार्शीज्ञात संकलक (गट-क) | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) D, HH<br>b) OA, BA, OL, BL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>c) ASD (M), SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |
| (१०) | रसायनशास्त्रज्ञ (गट-क) | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) D, HH<br>b) OA, BA, OL, Dw, AAV<br>c) ASD (M), SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |
| (११) | संशोधन सहाय्यक (गट-क) | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) D, HH<br>b) OA, BA, OL, BL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>c) ASD (M), SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |
| (१२) | संकलक (गट-क) | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, | a) D, HH<br>b) OA, BA, OL, BL, CP, LC, Dw, AAV, MDy |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दि. १२.०३.२०२१ | c) ASD (M), SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |
| (१३) | सहाय्यक छायाचित्रकार (गट-क) | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M, MoD), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| (१४) | ग्रंथपाल लिपिक-नि-भांडारपाल (गट-क) | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) LV<br>b) D, HH<br>c) OL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), ID, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| (१५) | अभिलेख परिचर (गट-क) | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (MoD), ID, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| (१६) | तंत्रज्ञ मदतनीस (गट-क) | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M, MoD), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| | सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई | | |
| (१७) | अधिक्षक (गट-ब अराजपत्रित) | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, BL, OAL, BLOA, CP, LC, Dw, AAV, MDy<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| (१८) | सहायक (गट-क) (कार्यालय-सां.कार्य) | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२५/ सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| | दर्शनिका विभाग, मुंबई | | |
| (१९) | सहायक संशोधन अधिकारी (गट-ब अराजपत्रित) | शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२१२१/प्र.क्र.२५/सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| (२०) | सहायक (गट-क) (कार्यालय-दर्शनिका) | शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२१२१/प्र.क्र.२५/सां.का.२, दि. १२.०३.२०२१ | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>d) ASD (M, MOD), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| | महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती साहित्य अकादमी, मुंबई | | |
| (२१) | टिप्पणी सहायक (गट-क) | शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-८२२१/प्र.क्र.३८/सां.का.४, दि. ०२.०३.२०२१ | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, OL, BA, BL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), SLD, MI |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | e) MD involving (a) to (d) above |

४.२५ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४.२६ दिव्यांग व्यक्तीची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनानाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.२७ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

४.२८ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

४.२९ लक्षणीय दिव्यांगत्य असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतीच्या दाव्यास पात्र असतील.

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती

(२) दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलती

४.३० दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि- २०१८/प्र.क्र.४६ / आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

४.३१ **अनाथ आरक्षण :**-अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

४.३२ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे; त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

४.३३ परीक्षेच्या अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्रे पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

४.३४ **माजी सैनिक आरक्षण:-** उमेदवार स्वतः माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

४.३५ माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार असतील.

४.३६ **प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण :**-शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २० जानेवारी, १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

४.३७ **भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण :**-शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : भूकंप-१००९/प्र.क्र. २०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

४.३८ **पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्याकरीता आरक्षण :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : पअंक-१००९/प्र.क्र. २००/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठीचे आरक्षण राहील.

४.३९ प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त तसेच अंशकालीन पदवीधर कर्मचारी यांच्याकरीताचे आरक्षण नियमानुसार लागू राहील.

५. पात्रता:-

(१) भारतीय नागरिकत्व

(२) वयोमर्यादा:- खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे

(३) वयोमर्यादा गणण्याचा दिनांक :- जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्यां उमेदवारांचे वय दिनांक १५/०८/२०२३ रोजी गणण्यात येईल.

(४) पद भरतीतील विविध प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी कमाल व किमान वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील.

| वर्गवारी | | किमान वय | कमाल वय |
|---|---|---|---|
| (१) सर्वसाधारण/महिला | अराखीव | १८ | ४० |
| | मागासवर्गीय/आर्थिदृष्ट्या दुर्बल घटक | १८ | ४५ |
| (२) प्राविण्यप्राप्त खेळाडु | अराखीव | १८ | ४३ |
| | मागासवर्गीय/ आर्थिदृष्ट्या दुर्बल घटक | १८ | ४३ |
| (३) अनाथ | अराखीव | १८ | ४३ |
| | मागासवर्गीय/ आर्थिदृष्ट्या दुर्बल घटक | १८ | ४३ |
| (४) माजी सैनिक, आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | अराखीव | १८ | ३८+ सेवा कालावधी+३ वर्ष |
| | मागासवर्गीय/ आर्थिदृष्ट्या दुर्बल घटक | १८ | ४३+ सेवा कालावधी+३ वर्ष |
| (५) दिव्यांग | अराखीव | १८ | ४५ |
| | मागासवर्गीय/ आर्थिदृष्ट्या दुर्बल घटक | १८ | ४५ |
| (६) प्रकल्पग्रस्त | - | १८ | ४५ |
| (७) भूकंपग्रस्त | - | १८ | ४५ |
| (८) पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | १८ | ५५ |

(५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या १२, दिनांक ०३.०३.२०२३ अन्वये विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत खुला व मागासप्रवर्गासाठी दोन वर्षे इतकी शिथिलता देण्यात आली आहे.

६. **शैक्षणिक अर्हता व अनुभव:-**

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| | पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई | |
| १ | सहाय्यक अधिक्षक (गट-क) | **शैक्षणिक अर्हता:-**<br>कला, विज्ञान, वाणिज्य, कायदा, अभियांत्रिकी किंवा कृषी यातील पदवी किंवा त्याच्या समतुल्य म्हणून शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही अर्हता. |
| २ | कनिष्ठ अभियंता (गट-क) | **शैक्षणिक अर्हता:-**<br>शासन मान्यताप्राप्त संस्थेचे स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणुन मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता. |
| ३ | जतन सहाय्यक (गट-क) | १) **शैक्षणिक अर्हता:-**<br>शासन मान्यताप्राप्त संस्थेचे स्थापत्य अभियांत्रिकी विषयात पदविका किंवा पदवी किंवा त्याच्या समकक्ष म्हणून शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही अर्हता.<br>२) **अनुभवाची अर्हता:-**<br>उपरोक्त (१) येथ नमूद शैक्षणिक अर्हता संपादन केल्यानंतर, संबंधित विषयात किमान ३ (तीन) वर्ष कामाचा अनुभव |

| | | |
|---|---|---|
| ४ | तंत्र सहाय्यक (गट-क) | **शैक्षणिक अर्हता:-**<br>(१) प्राचीन भारतीय इतिहासात पदव्युत्तर पदवी किंवा त्याच्या समकक्ष म्हणून शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही अर्हता,<br>किंवा<br>(२) प्राचीन भारतीय इतिहास किंवा संस्कृती, किंवा मध्ययुगीन भारतीय इतिहास विषयासह इतिहासात पदव्युत्तर पदवी,<br>किंवा<br>(३) संस्कृत किंवा पाली आणि प्राकृत विषयात पदव्युत्तर पदवी. |
| ५ | मार्गदर्शक व्याख्याता (गट-क) | १) **शैक्षणिक अर्हता:-**<br>माध्यमीक शालांत परीक्षा उत्तीर्ण किंवा त्याशी समतुल्य मान्यताप्राप्त परीक्षा उत्तीर्ण.<br>२) **अनुभवाची अर्हता:-**<br>शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर मार्गदर्शकाच्या कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| ६ | उप आवेक्षक (गट-क) | **शैक्षणिक अर्हता:-**<br>माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आणि शासनाद्वारे मान्यताप्राप्त इमारत पर्यवेक्षणातील (Bulding Supervision) कोर्समध्ये प्रमाणपत्र उत्तीर्ण. |
| ७ | छायाचित्रचालक (गट-क) | १) **शैक्षणिक अर्हता:-**<br>१. माध्यमिक शालेय प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण किंवा त्याच्या समकक्ष म्हणून शासनाने घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. आणि<br>२. कोणत्याही शासन मान्यताप्राप्त संस्थेचे फोटोग्राफीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक:<br>२) **अनुभवाची अर्हता:-**<br>उपरोक्त पोट-कलम (१) आणि (२) मध्ये नमूद केलेली अर्हता प्राप्त केल्यानंतर, इनडोअर आणि आउटडोअर फोटोग्राफी, विकास, छपाई, कॉपीचा दोन वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव असणे आवश्यक. |
| | पुराभिलेख संचालनालय, मुंबई | |
| ८ | अभिलेखाधिकारी (गट-ब अराजपत्रित) | **१) शैक्षणिक अर्हता:-**<br>ज्याने कला शाखेची इतिहास विषयाची "आधुनिक भारताचा इतिहास" या मुख्य विषयासह किमान व्दितीय वर्गातील पदवी धारण केली आहे, आणि<br>**२) अनुभवाची अर्हता:-**<br>अ) ज्याने कोणत्याही शासकीय संग्रह स्थानात किंवा मान्यताप्राप्त संस्थेतील जुन्या व ऐतिहासिक अभिलेखातून संशोधन, सुचिकरण, निर्देशसूची तयार करणे, अभिलेखांच्या याद्या तयार करणे व अभिलेख व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष कामाचा दोन वर्षाचा अनुभव मिळविला आहे.<br>आ) परंतु ज्या उमेदवाराला मोडी लिपी, फार्शी, उर्दु भाषा, पुराभिलेख शास्त्र याची माहिती आहे जे आधुनिक भारताचा इतिहास या वैकल्पिक विषयासह इतिहास विषयात किंवा इंडो ब्रिटीश कालावधीतील भारतीय इतिहास या विषयावर संशोधन करुन एम.ए.पदवी धारण केलेली आहे. अशा उमेदवारांना पसंतीक्रम देण्यात येईल. |
| ९ | फार्शीज्ञात संकलक | **१) शैक्षणिक अर्हता:-** |

| | | |
|---|---|---|
| | (गट-क) | ज्याने कला शाखेची इतिहास हा मुख्य विषय घेऊन फारसी विषयासह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी धारण केलेली आहे, आणि<br>**२) अनुभवाची अर्हता:-**<br>अ) ज्याला फारसी आणि इंग्रजी भाषेची पूर्ण माहिती आहे.<br>आ) ज्याने वरील उपखंड (१) मध्ये नमुद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर ऐतिहासिक अभिलेखाचे संशोधन, निर्देशसूची तयार करणे, अभिलेखांच्या याद्या तयार करणे व फार्शी आणि इंग्रजी अभिलेखाचे लिप्यंतर करण्याचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळविला आहे, अशा उमेदवारांना पसंतीक्रम देण्यात येईल. |
| १० | रसायनशास्त्रज्ञ<br>(गट-क) | **१) शैक्षणिक अर्हता:-**<br>ज्याने विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र या मुख्य विषयासह पदवी धारण केली आहे.<br>**२) अनुभवाची अर्हता:-**<br>ज्याने वरील (१) येथे नमूद शैक्षणिक अर्हता संपादन केल्यानंतर एखाद्या शासकीय विभागातील किंवा मान्यताप्राप्त संस्थेतील कॉन्झरवेशन लॅबोरेटरीमधील दस्तऐवज (कागदपत्रे) परिरक्षणाच्या कामाचा किमान दोन वर्ष कालावधीचा अनुभव मिळालेला आहे. |
| ११ | संशोधन सहाय्यक<br>(गट-क) | **१) शैक्षणिक अर्हता:-**<br>ज्याने कला शाखेची इतिहास विषयातील आधुनिक भारताचा इतिहास या पेपरसह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी धारण केली आहे.<br>**२) अनुभवाची अर्हता:-**<br>आणखी अशीही तरतूद करण्यात येते की, ज्याने वरील उपखंड (१) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर ज्याने कोणत्याही शासकीय संग्रह स्थानात किंवा मान्यताप्राप्त संस्थेतील जुन्या व ऐतिहासिक अभिलेखातून संशोधन, सूचीकरण, निर्देशसूची तयार करणे, अभिलेखांच्या याद्या तयार करणे व अभिलेख व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष कामाचा दोन वर्षाचा अनुभव मिळविला आहे, किंवा ज्याला मोडी लिपीचे देवनागरी लिपीत लिप्यंतर करण्याची माहिती आहे. |
| १२ | संकलक<br>(गट-क) | **१) शैक्षणिक अर्हता:-**<br>ज्याने कला शाखेची इतिहास विषयातील आधुनिक भारताचा इतिहास या पेपरसह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी धारण केली आहे.<br>**२) अनुभवाची अर्हता:-**<br>आणखी अशीही तरतूद करण्यात येते की, ज्याने वरील उपखंड (१) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर ज्याने कोणत्याही शासकीय संग्रह स्थानात किंवा मान्यताप्राप्त संस्थेतील जुन्या व ऐतिहासकि अभिलेखातून संशोधन, सूचीकरण, निर्देशसूची तयार करणे, अभिलेखांच्या याद्या तयार करणे व अभिलेख व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष कामाचा दोन वर्षाचा अनुभव मिळविला आहे, किंवा ज्याला मोडी लिपीचे देवनागरी लिपीत लिप्यंतर करण्याची माहिती आहे. |
| १३ | सहाय्यक छाया चित्रकार<br>(गट-क) | **१) शैक्षणिक अर्हता:-**<br>(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक परीक्षा मंडळाने घेतलेली विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा किमान दुसऱ्या श्रेणीत उत्तीर्ण केलेली असावी.<br>(२) मान्यताप्राप्त संस्थेचे छायाचित्रणातील प्रमाणपत्र किंवा तत्सम अर्हता आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| | | **२) अनुभवाची अर्हता:-**<br>(१) पायाभुत छायाचित्रणाचा किमान २ वर्षाचा गुणवत्ता मान्य अनुभव असावा.<br>(२) छायाचित्रणाच्या मुद्रण व विकास या प्रक्रीयेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. |
| १४ | ग्रंथपाल लिपिक-नि-भांडारपाल (गट-क) | **१) शैक्षणिक अर्हता:-**<br>१) ज्याने उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण् केली आहे.<br>२) ज्याने ग्रंथालय शास्त्राची पदविका धारण केली आहे.<br>**२) अनुभवाची अर्हता:-**<br>ज्याने वरील (दोन) येथील अर्हता धारण केल्यानंतर कोणत्याही शासकीय विभाग किंवा वाणिज्य आस्थापना किंवा स्थानिक स्वराज्य संस्था किंवा शासनाने गठीत केलेल्या महामंडळात ग्रंथालय लिपिक-नि-भांडारपाल या पदावर किमान २ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव मिळविलेला आहे. |
| १५ | अभिलेख परिचर (गट-क) | **१) शैक्षणिक अर्हता :-**<br>ज्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, आणि<br>२) **अनुभवाची अर्हता:-**<br>ज्यांना अभिलेख अद्यावत ठेवणे, विभागवार व वर्षवार अभिलेख व्यवस्थित लावणे, अभिलेखांची गणना करणे या कामाचा ३ वर्षाचा अनुभव आहे. |
| १६ | तंत्रज्ञ मदतनीस (गट-क) | **१) शैक्षणिक अर्हता :-**<br>माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>२) **अनुभवाची अर्हता:-**<br>छायाचित्रणाचे प्राथमिक ज्ञान व किमान दोन वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल. |
| | **सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई** | |
| १७ | अधिक्षक गट-ब (अराज पत्रित) | **शैक्षणिक अर्हता :-**<br>शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी अर्हता उत्तीर्ण. |
| १८ | सहायक (गट-क) | **शैक्षणिक अर्हता :-**<br>शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी अर्हता उत्तीर्ण |
| | **दर्शनिका विभाग, मुंबई** | |
| १९ | सहायक संशोधन अधिकारी गट-ब (अराजपत्रित) | **शैक्षणिक अर्हता :-**<br>अर्थशास्त्र, इतिहास किंवा समाजशास्त्र यामधील स्नातक पदवी धारण केलेली आहे. |
| २० | सहायक (गट-क) | **शैक्षणिक अर्हता :-**<br>अर्थशास्त्र, इतिहास किंवा समाजशास्त्र यामधील स्नातक पदवी धारण केलेली आहे. |
| | महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती साहित्य अकादमी, मुंबई | |
| २१ | टिप्पणी सहायक (गट-क) | **शैक्षणिक अर्हता :-**<br>पदवी धारण केलेली असावी. |

**विशेष सुचना:-**सर्व पदांकरीता अर्ज करण्याच्या अंतिम दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ किंवा त्यापुर्वी विहित शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण केलेला असणे अनिवार्य आहे.

७. **निवडप्रक्रिया :-**सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया जाहिरातीत नमुद पदांचे शासनाने विहित केलेल्या सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा तसेच सुधारण्यात येणाऱ्या पदभरतीच्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल.

जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र असणार नाही.

८.१ **निवडपद्धत** :-पदभरतीच्या सर्व पदांसाठी संगणक आधारीत परीक्षा (Computer Based online examination) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात घेण्यात येईल. ऑनलाईन परीक्षा मुंबई/नवी मुंबई/ठाणे/मुंबई महानगर प्रदेश या ठिकाणी घेण्यात येईल. त्याबाबतचा तपशिल उमेदवारांना प्रवेशपत्रासोबत देण्यात येईल.

८.२ पदभरतीकरीता (ऑनलाईन) परीक्षा ही मराठी व इंग्रजी माध्यमातुन संगणक प्रणालीव्दारे घेण्यात येईल. संगणक आधारीत परीक्षेव्दारे (Computer Based online examination) घेण्यात येणाऱ्या परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल. सर्व पदांच्या परीक्षांसाठी पदनिहाय अभ्यासक्रमाच्या तपशिलाचे परिशिष्ठ-अ सोबत जोडले आहे.

८.३ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२ /प्र.क्र.५४/का.१३ अ, दिनांक ०४.०५.२०२२ नुसार जे उमेदवार लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त करतील अशाच उमेदवारांचा निवडीसाठी विचार करण्यात येईल.

८.४ संगणकीय परिक्षेसाठी उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

८.५ संगणकीय परिक्षेमध्ये उमेदवारास समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभागाचे उक्त शासन निर्णय दि. ०४.०५.२०२२ मधील तरतुदीनुसार निवड प्रक्रियेची कार्यवाही करण्यात येईल.

८.६ पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र व परिक्षेविषयी आवश्यक सुचना 1) https://mahaarchaeology.in/ 2) http://www.maharashtra-archives.org 3) https://www.mahasanskruti.org/ 4) https://www.mahasahitya.org/ 5) www.gazetteers.maharashtra.gov.in 6) http://mahagazetteers.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावीत. संगणकीय परिक्षेनंतर सर्वसाधारण गुणवत्ता यादीसुद्धा उक्त संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारास स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८.७ गुणवत्तेनुसार गट-ब (अराजपत्रित) व गट-क पदावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी ऑनलाईन आवेदनपत्रात सादर केलेल्या माहितीनुसार मुळ कागदपत्रांची पडताळणी निवड समितीमार्फत करुनच पदनियुक्तीशी संबंधित कार्यालयांकडुन नियुक्ती देण्यात येईल.

८.८ निवडसमितीस कागदपत्रे पडताळणीमध्ये मुळ प्रमाणपत्रे चुकीची, अपूर्ण अथवा खोटी माहिती आढळून आल्यास त्या टप्प्यावर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल व चुकीची माहिती सादर केल्याबद्दल शासन नियमानूसार कारवाई करण्यात येईल.

**९. शुल्क :-**

(१) अमगास १०००/-रु.

(२) मागासवर्गीय / आ.दु.प/अनाथ/दिव्यांग /माजी सैनिक ९००/-रु.

(३) उपरोक्त परीक्षा शुल्का व्यतिरिक्त बैंक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

(४) परीक्षा शुल्क ना परतावा (Non refundable) आहे.

**१०. अर्ज करण्याची पध्दत:-**

(१) प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाइन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येईल.

(२) पात्र उमेदवाराला वेब आधारीत (web-based) ऑनलाईन अर्ज 1) https://mahaarchaeology.in/ 2) http://www.maharashtra-archives.org 3) https://www.mahasanskruti.org/ 4) https://www.mahasahitya.org/ 5) www.gazetteers.maharashtra.gov.in 6) http://mahagazetteers.com या संकेतस्थळाद्वारे https://ibpsonline.ibps.in/dambcdjun23/ या लिंक वरुन दिनांक १५/०८/२०२३ (००:००:०१ पासुन) ते ०५/०९/२०२३ (२३:५९:०० पर्यंत) या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

(३) विहीत पध्दतीने अर्ज ऑनलाईन सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय परीक्षेसाठी उमेदवारी विचारात घेतली जाणार नाही.

**११. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचनाः**

(१) उपरोक्त नमुद पदांच्या भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन आवेदन अर्ज वर नमुद संकेतस्थळांवर मागविण्यात येत आहेत. पात्र उमेदवारांना नमुद संकेतस्थळावर दिनांक १५/०८/२०२३ (००:००:०१ पासुन) ते ०५/०९/२०२३ (२३:५९:०० पर्यंत) या कालावधीमध्ये वेब बेस्ड (Web-Based) ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तसेच ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा दिनांक १५/०८/२०२३ (००:००:०१ पासुन) ते ०५/०९/२०२३ (२३:५९:०० पर्यंत) या कालावधीमध्ये करता येईल.

(२) विहित पद्धतीने मुदतीत म्हणजेच दिनांक ०५/०९/२०२३ (२३:५९:०० पर्यंत) पर्यंत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने रक्कम भरण्याची कार्यवाही दिनांक १५/०८/२०२३ (००:००:०१ पासुन) ते ०५/०९/२०२३ (२३:५९:०० पर्यंत) पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बंद होईल.

(३) परीक्षा स्थगित व रद्द करणे, परीक्षेचे स्वरूप, परीक्षेची तारीख व ठिकाणात बदल करणे, पदसंख्या वाढ किंवा घट करण्याचे अधिकार निवडसमितीस राहतील व समितीचा निर्णय अंतिम असेल, त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वा तक्रारी बाबत निर्णय घेण्याचा अधिकार समितीस राहील व समितीचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्र व्यवहाराची दाखल घेतली जाणार नाही.

(४) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व पात्रता तपासूनच उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावा.

(५) उमेदवारांची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. उमेदवाराना ऑनलाईन परीक्षेतील मिळालेल्या गुणांच्या आधारे तसेच त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिद्ध करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे सर्व अधिकार निवडसमिती राखून ठेवीत आहेत.

(६) परीक्षेच्या वेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल, गणकयंत्र (Calculator), आय पेंड वा तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधने वापरण्यास सक्त मनाई आहे.

(७) उमेदवारास परीक्षा / कागदपत्र पडताळणी इत्यादी करीता स्वखर्चाने यावे लागेल.

(८) ऑनलाईन परीक्षा स्थळामध्ये वाढ/बदल करण्याचे अधिकार निवडसमितीस राहतील. परिक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(९) परीक्षेचे प्रवेशपत्र उक्त संकेतस्थळावरून स्वतः डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पद्धतीने पाठविले जाणार नाही.

(१०) पात्र उमेदवारांचा अंतिम निकाल 1) https://mahaarchaeology.in/ 2) http://www.maharashtra-archives.org 3) https://www.mahasanskruti.org/ 4) https://www.mahasahitya.org/ 5) www.gazetteers.maharashtra.gov.in 6) http://mahagazetteers.com या संकेतस्थळांवर जाहीर करण्यात येईल.

**१२. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्यापूर्वी लक्षात घेण्यासारखे महत्त्वाचे मुद्दे :-**

(१) ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी खालील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे / स्वाक्षरी इत्यादींचे स्कॅन

(२) छायाचित्र (४.५ सें.मी. X ३.५ सें.मी.)

(३) स्वतःची स्वाक्षरी (काळ्या शाईने)

(४) स्वतःच्या डाव्या अंगठ्याचा ठसा (काळ्या किंवा निळ्या शाईचा पांढऱ्या कागदावर)

(५) इंग्रजी भाषेतील खाली दिलेला मजकूर असलेले स्वहस्ताक्षरात लिहिलेले घोषणापत्र (पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने)

(६) हे सर्व स्कॅन केलेले दस्तऐवज या जाहिरातीतील मुद्दा १३ मध्ये नमूद तपशिलाप्रमाणे आहेत याची खात्री उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी करावी .

(७) इंग्रजी भाषेतील मोठ्या अक्षरातील (Capital Letters) स्वाक्षरी स्वीकारली जाणार नाही.

(८) डाव्या अंगठ्याचा ठसा योग्यरित्या स्कॅन केलेला असावा आणि त्यावर डाग येऊ देऊ नये. (उमेदवारास डावा अंगठा नसल्यास असा उमेदवार अर्ज करण्यासाठी उजव्या अंगठ्याचा चापर करू शकतो.)

(९) हस्तलिखित घोषणेचा मजकूर खालीलप्रमाणे आहे

Declaration

"I, (name of the candidate) hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required."

(Signature of Candidate)

(१०) वर नमूद केलेले घोषणापत्र उमेदवाराने स्वहस्तलिखित आणि फक्त इंग्रजी भाषेत लिहिलेले असावे. घोषणापत्र इतर कोणत्याही भाषेत लिहिलेले आणि अपलोड केले असल्यास, त्या उमेदवाराचा अर्ज अवैध मानला जाईल. (दृष्टीहीन उमेदवारांच्या बाबतीत जे स्वहस्ते लिहू शकत नाहीत त्यांनी घोषणेचा मजकूर टाईप करून टाईप केलेल्या घोषणेच्या खाली डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा लागाया आणि तपशीलानुसार कागदपत्र अपलोड करावे.)

(११) ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा करण्यासाठी आवश्यक सर्व माहिती व कागदपत्रे तयार ठेवावीत.

(१२) उमेदवारांकडे स्वतःचा चालू स्थितीतील वैध वैयक्तिक ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक असावा, स्वतःचा ई-मेल आयडी नसल्यास तो तयार करून घेण्यात यावा. वैयक्तिक ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी क्रमांक सदरची भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू (सक्रिय) ठेवावा. नोंदणीकृत ई-मेल आयडीद्वारे परीक्षेसाठी प्रवेश पत्र डाउनलोड करण्यासाठी सूचना देण्यात येतील.

(१३) **अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सूचना:**

**१३.१ अर्ज नोंदणी-**

(१) उमेदवाराला पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयालयांच्या 1) https://mahaarchaeology.in/ 2) http://www.maharashtra-archives.org 3) https://www.mahasanskruti.org/ 4) https://www.mahasahitya.org/ 5) www.gazetteers.maharashtra.gov.in 6) http://mahagazetteers.com या संकेतस्थळावरुन https://ibpsonline.ibps.in/dambcdjun23/ या लिंकवर लॉगइन (Log in) करावे लागेल.

(२) उमेदवारांनी उपरोक्त संकेतस्थळांवर जाऊन "https://ibpsonline.ibps.in/dambcdjun23/" वर क्लिक (Click) करा, जे एक नवीन स्क्रीन उघडेल.

(३) अर्ज नोंदणी करण्यासाठी, "नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक करा" (Click here for New Registration) टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ई-मेल आयडी प्रविष्ट करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रीनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरती नोंदणी क्रमांक (Registration No) आणि पासवर्ड (Password) दर्शविणारा ई-मेल आणि एसएमएस देखील पाठविला जाईल.

(४) जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरू शकत नसेल, तर तो "जतन करा पुढे जा" (SAVE AND NEXT) टॅब निवडून आधीच प्रवेश केलेला डेटा जतन करू शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी व आवश्यक बदल करण्यासाठी "जतन करा

पुढे जा" (SAVE AND NEXT) सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. दृष्टिहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिमरित्या सादर करण्यापूर्वी ते योग्य असल्याची खात्री करण्यासाठी तपशिलांची पडताळणी करून घ्यावी.

(५) उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी स्वतः करावी. एकदा "पूर्ण नोंदणी बटणावर" (COMPLETE REGISTRATION BUTTON ) क्लिक केल्यानंतर अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

(६) उमेदवाराने स्वतःचे नाव, त्याचे/ तिचे किंवा वडील / पती इ. चे नाव जसे प्रमाणपत्रे / गुणपत्रिका / ओळखपत्र पुराव्यामध्ये नमूद आहे त्याप्रमाणेच अर्जामध्ये नमूद करण्यात यावे. उमेदवाराच्या ओळखपत्र / पुराव्यामधील नाव व अर्जामध्ये नमूद केलेले नाव यामध्ये कोणताही बदल आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरू शकते.

(७) उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेले तपशील सत्यापित (Validate) करून आपला अर्ज जतन करण्यासाठी Validate your details व Save and Next बटणावर क्लिक (Clilok) करून अर्ज जतन करावा. १३.१.९ या सूचनांतील मुद्दा १३.३ ते १३.५ मध्ये छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या तपशिला नुसार उमेदवार त्यांचे फोटो व स्वाक्षरी अपलोड करू शकतील.

(८) उमेदवाराने त्यांचे इतर तपशील अर्जामध्ये नमूद करावेत.

(९) अर्जाच्या संपूर्ण नोंदणीपूर्वी अर्जदाराने आपल्या अर्जाचे पूर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी Preview बटणावर क्लिक करून अर्जाचे पूर्वावलोकन व पडताळणी करावी व भरलेले अर्ज, छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच "COMPLETE REGISTRATION ONLY / पूर्ण नोंदणी" वर क्लिक करा.

(१०) परीक्षा शुल्क भरणा करण्यासाठी (Payment) टॅबवर क्लिक (Click करा आणि परीक्षा शुल्क भरण्यासाठी (Fees Payment) साठी पुढे जावे.

(११) सादर (Submit) बटणावर क्लिक (Click) करा.

**टीप :** USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. ब) उमेदवारांने नोंदणी प्रक्रियेसाठी स्वतःचाच वैध / प्रमाणित ई-मेल आयडी वापरावा. अन्य व्यक्तींचा ई- मेल आयडी वापरु नये.

**१३.२ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे :-**

(१) ऑनलाईन अर्ज परीक्षा शुल्कासह भरण्याची सुविधा (payment gateway) उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार परीक्षा शुल्क भरण्याबाबत दिलेल्या सूचनांचे अनुसरण करून परीक्षा शुल्क भरणा करण्यात यावा.

(२) परीक्षा शुल्क भरणा डेबिट कार्ड (RuPay/Visa/Master Card/Maestro ), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बैंकिंग, IMPS, कॅश कार्ड / मोबाइल वॉलेट वापरून केले जाऊ शकते.

(३) ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने परीक्षा शुल्क भरल्या बाबतची माहिती सादर केल्यानंतर, कृपया सर्व्हरकडून प्रतिसाद मिळण्याची प्रतीक्षा करा. परीक्षा शुल्क पुनरावृत्ती टाळण्यासाठी मागे (Back)/ रिफ्रेश (Refresh) बटण (Key) दाबू नये.

(४) व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यावर एक ई- पावती (E-Receipt) तयार होईल.

(५) 'ई- पावती (E-Receipt) तयार न होणे परीक्षा शुल्क भरणा अयशस्वी झाल्याचे दर्शवते. Payment अयशस्वी झाल्यास, उमेदवारांनी त्यांचा तात्पुरता नोंदणी क्रमांक (Registration No) आणि पासवर्ड (Password) वापरून पुन्हा लॉग इन करावे आणि Payment ची प्रक्रिया पुनश्चः पूर्ण करण्यात यावी.

(६) उमेदवारांनी परीक्षा शुल्क भरल्याची ई-पावती (E-Receipt) आणि फी चा तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची मुद्रित प्रत (Print out) काढून घेणे आवश्यक आहे. ई-पावती व अर्जाची प्रत स्क्रीनवर न आल्यास ऑनलाईन व्यवहार यशस्वी झाला नसल्याचे दर्शविते.

(७) क्रेडिट कार्ड वापर कर्त्यांसाठी सर्व शुल्क भारतीय रुपयामध्ये सूचीबद्ध आहेत. तुम्ही गैर-भारतीय क्रेडिट कार्ड वापरत असल्यास, तुमची बँक प्रचलित विनिमय दरांवर आधारित तुमच्या स्थानिक चलनात रूपांतरित करेल.

(८) तुमच्या डेटाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, कृपया तुमचा व्यवहार पूर्ण झाल्यावर ब्राउझर विंडो (Browser window) बंद करा.

(९) फी भरल्याचा तपशील असलेल्या अर्जाची मुद्रीत प्रत (Printout) काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(१०) स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक सूचना:- ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराकडे खाली दिलेल्या तपशिलानुसार त्याचे छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र यांची स्कॅन केलेली (डिजिटल) प्रतिमा असणे आवश्यक आहे.

**१३.३ छायाचित्र प्रतिमा (४.५० x ३.५am) :-**

(१) छायाचित्र अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत असणे आवश्यक आहे.

(२) सदरचे छायाचित्र रंगीत, हलक्या रंगाच्या विरुद्ध, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीवर घेतलेले आहे याची खात्री करा.

(३) कॅमेऱ्याकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे.

(४) छायाचित्र सूर्यप्रकाशात काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी,

(५) तुम्हाला फ्लॅश वापरायचा असल्यास, "Red Eye" येणार नाही याची दक्षता घ्यावी.

(६) जर तुम्ही चष्मा घालत असाल तर त्यात कोणतेही प्रतिबिंब येणार नाही आणि तुमचे डोळे स्पष्टपणे दिसू शकतील याची खात्री करा.

(७) छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गडद चष्मा घालू नये. धार्मिक पगडी (Headwear) वापरण्यास परवानगी आहे, परंतु त्याने तुमचा चेहरा झाकता कामा नये.

(८) परिमाण २०० x २३० पिक्सेल (प्राधान्याने).

(९) फाईलचा आकार २०kb ५० kb दरम्यान असावा.

(१०) स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार ५०kb पेक्षा जास्त नसल्याची खात्री करा. जर फाईलचा आकार ५० kb पेक्षा जास्त असेल, तर स्कॅनरची सेटिंग्ज समायोजित करा जसे की DPI रिझोलुशन, नंबर ऑफ कलर इ.

**१३.४ स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र प्रतिमा**

(१) अर्जदाराला पांढऱ्या कागदावर काळ्या शाईच्या पेनने स्वाक्षरी करावी लागेल.

(२) परिमाण १४० x ६० पिक्सेल (प्राधान्याने).

(३) फाईलचा आकार १०kb-२०kb दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २०kb पेक्षा जास्त नसल्याची खात्री करा.

(४) अर्जदाराने त्याच्या डाव्या अंगठ्याचा ठसा काळ्या किंवा निळ्या शाईने पांढऱ्या कागदावर लावावा.

(५) फाईल प्रकार:- jpg / jpeg

(६) परिमाणे:- २०० DPI मध्ये २४० x २४० पिक्सेल (आवश्यक गुणवत्तेसाठी प्राधान्य) म्हणजे ३ सेमी * ३ सेमी (रुंदी*उंची).

(७) फाईल आकारः २०KB-५० KB

(८) अर्जदाराने पांढऱ्या कागदावर इंग्रजीत काळ्या शाईने स्पष्टपणे घोषणा लिहावी.

(९) फाईल प्रकार:- jpg/jpeg

(१०) परिमाणे २०० DPI मध्ये ८०० x ४०० पिक्सेल (आवश्यक गुणवत्तेसाठी प्राधान्य) म्हणजे १० सेमी* ५ सेमी (रुंदी * उंची

(११) फाईल आकार: ५० KB-१००KB

(१२) स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अर्जदाराचे स्वतःचे असावे, इतर कोणत्याही व्यक्तीचे नसावे.

(१३) परीक्षेच्या वेळी स्वाक्षरी केलेल्या उपस्थिती पत्रकावरील किंवा प्रवेश पत्रावरील अर्जदाराची स्वाक्षरी अपलोड केलेल्या स्वाक्षरीशी जुळत नसल्यास, अर्जदारास अपात्र घोषित केले जाईल.

(१४) इंग्रजी मोठ्या अक्षरातील (Capital Letters) स्वाक्षरी / हस्तलिखित घोषणापत्र स्वीकारली जाणार नाही.

**१३.५ कागदपत्रे स्कॅन करणे:**

(१) स्कॅनर रिझोल्यूशन किमान २०० dpi (बिंदू प्रति इंच) वर सेट करा.

(२) रंग मूळ रंगावर सेट करा.

(३) वर नमूद केल्याप्रमाणे फाईलचा आकार असावा.

(४) स्कॅनरमधील प्रतिमा छायाचित्र / स्वाक्षरी / डाव्या अंगठ्याचा ठसा / हाताने लिहिलेल्या घोषणेच्या काठावर क्रॉप करा, नंतर प्रतिमा अंतिम आकारात क्रॉप करुन अपलोड करावी. ( वर नमुद केल्याप्रमाणे).

(५) प्रतिमा फाईल JPG किया JPEG फॉरमॅटमध्ये असावी. उदा :- image०१.jpg किंवा image०९.jpeg. फोल्डर फावलीमध्ये सूचीबद्ध करून किंवा फाईल प्रतिमा चिन्हावर गाउस हलवून प्रतिमा परिमाण तपासले जाऊ शकते. MS Windows / MS Office वापरणारे उमेदवार MS Paint किंवा MS Office Picture Manager वापरून .jpeg फॉरमॅटमध्ये कागदपत्रे सहज मिळवू शकतात. फाइल मेनूमधील "Save As / सेव्ह अँज" पर्याय वापरून कोणत्याही फॉरमॅटमध्ये स्कॅन केलेले दस्तऐवज .jpg/.jpeg फॉरमॅटमध्ये जतन केले जाऊ शकतात. क्रॉप आणि नंतर आकार बदला पर्याय वापरून आकार समायोजित केला जाऊ शकतो.

**१३.६ कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया-**

(१) ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.

(२) संबंधित लिंकवर क्लिक करा "छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड करा / डाव्या अंगठ्याचा ठसा / स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र" अपलोड करा.

(३) स्कॅन केलेले छायाचित्र / स्वाक्षरी / डाव्या अंगठ्याचा ठसा / स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र फाईल सेव्ह केलेली जागा ब्राउझ करा आणि निवडा.

(४) त्यावर क्लिक करून फाईल निवडा.

(५) ओपन / अपलोड वर क्लिक करा.

(६) फाईलचा आकार आणि स्वरूप निर्धारित केल्याप्रमाणे नसल्यास, एक त्रुटी संदेश प्रदर्शित केला जाईल.

(७) अपलोड केलेल्या प्रतिमेची गुणवत्ता पाहण्यास पूर्वावलोकन (Preview) मदत करेल. अस्पष्ट / डागाळलेल्या प्रतिमा असल्यास त्या जागी स्पष्ट प्रतिमा पुनश्चः अपलोड करता येतील.

(८) उमेदवाराने स्वतःचा फोटो, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड केल्याशिवाय त्यांचा ऑनलाइन अर्ज नोंदणी होणार नाही.

(९) छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या अंगठ्याचा ठसा किंवा स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.

(१०) उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र/स्वाक्षरी/डाव्या अंगठ्याचा ठसा/ स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे. छायाचित्र किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा किंवा स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र ठळकपणे दृश्यमान नसल्यास, उमेदवार आपला अर्ज संपादित (Edit) करू शकतो आणि त्याचे छायाचित्र किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या अंगठ्याचा ठसा किंवा हाताने लिहिलेली घोषणा फॉर्म सबमिट करण्यापूर्वी पुन्हा अपलोड करू शकतो.

(११) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करतेवेळी त्याचा फोटो व स्वाक्षरी ज्या ठिकाणी फोटो अपलोड करणे अपेक्षित आहे त्याच ठिकाणी अपलोड केले आहे याची खात्री करावी. फोटोच्या जागी फोटो आणि स्वाक्षरीच्या जागी स्वाक्षरी अपलोड केलेली नसल्यास उमेदवाराला परीक्षेला बसू दिले जाणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची असेल.

(१२) उमेदवाराने अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचाच आहे व त्यामध्ये उमेदवाराचा चेहरा स्पष्टपणे दिसत आहे हे सुनिश्चित केले पाहिजे.

(१३) उमेदवारांनी अपलोड केलेली स्वाक्षरी स्पष्टपणे दिसत असल्याची खात्री करावी.

(१४) ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची मुद्रीत प्रत (Print out) काढून घ्यावी.

**१४. अर्ज करण्यासाठी इत्तर सूचना :**

(१) उमेदवाराचे नाव, वडिलांचे, पतीचे नाव, आडनाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी, पत्रव्यवहाराचा पत्ता ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.

(२) पत्ता नमूद करताना उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. (उदा. पत्रव्यवहाराचा पत्ता व कायमचा पत्ता किंवा दोन्ही.)

(३) त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक कराये आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी.

(४) ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी तसेच उमेदवाराने आधार क्रमांक / आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी.

(५) मराठी भाषेतील प्रावीण्य, MS-CIT प्रमाणपत्र (D.D.EA.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र) या संबंधिची माहिती भरावी.

(६) एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केल्यानंतर अर्जदारास पुढे (Next) या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

(७) उमेदवारास अर्ज करावयाच्या पदाची निवड करावी लागेल.

(८) ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेस रात्री २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर संकेतस्थळा वरील लिंक बंद होईल.

(९) जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉग इन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची नव्याने केलेली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे परीक्षा प्रवेशपत्र, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, उमेदवारास ऑनलाईन अर्ज करताना कोणतीही शंका असल्यास त्याबाबत https://cgrs.ibps.in/ या हेल्पडेक्स लिंक (Helpdesk link) वर संपर्क साधता येईल.

(१०) नोंदणीमधील तपशील जसे की, वापरकर्ता नाव (USERNAME), ई-मेल आयडी, पसंतीचे स्थान, जन्म तारीख, उमेदवाराचे छायाचित्र (Photograph) आणि स्वाक्षरी इत्यादी आवेदन पत्र सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

(११) **अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:**युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉग इन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

(१२) अर्ज प्रिंट करण्यासाठी "प्रिंट प्रिव्हयू" या पर्यायावर क्लिक करा.

(१३) उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेशपत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वतः जवळ जतन करून ठेवणे अनिवार्य राहील.

**१५. परीक्षा केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना:-**

(१) उमेदवारांना नेमून दिलेले परीक्षा केंद्र व त्याचा पत्ता प्रवेश पत्रात नमूद करण्यात येईल. संबंधित परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.

(२) उमेदवाराने एकदा केलेली परीक्षा केंद्राची निवड अंतिम असेल. परीक्षेचे केंद्र/स्थळ/तारीख/वेळ/ सत्र बदलण्याची कोणतीही विनंती कोणत्याही परिस्थिती मध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

(३) कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि / किंवा परीक्षा केंद्र वाढविणे याचे अधिकार निवडसमिती स्वतःकडे राखून ठेवीत आहे.

(४) उमेदवाराला त्याने/तिने निवडलेल्या केंद्रा व्यतिरिक्त इतर कोणतेही केंद्र वाटप करण्याचा अधिकार समिती स्वतः कडे राखून ठेवीत आहे.

(५) उमेदवाराने परीक्षा केंद्रावर स्वतःच्या जोखमीवर आणि स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यास कोणताही प्रवास खर्च वा भत्ता दिला जाणार नाही किंवा उमेदवारास कोणत्याही स्वरूपाच्या इजा किंवा नुकसानीसाठी विभाग जबाबदार राहणार नाही.

(६) उमेदवारांनी एखाद्या विशिष्ट परीक्षा केंद्राची पुरेशा संख्येने निवड केलेली नसल्यास किंवा एखाद्या केंद्राची निवड त्या केंद्राच्या उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त उमेदवारांनी केलेली असल्यास उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी इतर कोणतेही संलग्न केंद्र वाटप करण्याचा अधिकार निवडसमितीस राहील.

(७) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये ( अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.

**१६. दिव्यांग व्यक्तींसाठी मार्गदर्शक सूचना :-**

(१) दृष्टिहीन व ज्यांच्या लेखन गतीवर कायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम झालेला आहे असे उमेदवार ऑनलाईन परीक्षे दरम्यान खालील मुद्दा ९ आणि १० मध्ये नमूद मर्यादेच्या अधीन राहून लेखनिकाचा वापर करू शकतात, जेथे लेखनिक वापरला जातो अशा सर्व प्रकरणांसाठी खालील नियम लागू होतील:

(२) उमेदवाराला त्याच्या / तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल.

(३) उमेदवाराने निवडलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखनिक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखनिकाच्या सेवा वापरण्यास पात्र व इच्छित उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमूद करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमूद नसल्यास नंतर लेखनिक वापरण्याची केलेली कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

(४) लेखनिक म्हणून सेवा देणारी व्यक्ती एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखनिक म्हणून सेवा देऊ शकणार नाही. त्याबाबत उमेदवाराने आवश्यक ती काळजी घ्यावी.

(५) लेखनिक उपरोल्लिखित सर्व विहित अर्हतेचे निकषांची पूर्तता करीत असल्याचे योग्य हमीपत्र उमेदवार आणि लेखनिक दोघांनाही परीक्षा सुरु होण्यापूर्वी समवेक्षक/केंद्र प्रमुख यांचेकडे द्यावे लागेल. तद्नंतर जर उमेदवार किंवा लेखनिक विहित अर्हतेच्या निकषांची पूर्तता करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा त्यांनी मुलभूत माहिती दडविली असल्याचे निष्पन्न झाल्यास ऑनलाईन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता, अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

(६) जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात त्यांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी २० मिनिटे अतिरिक्त वेळ भरपाई म्हणून देण्यात येईल. परीक्षेदरम्यान लेखनिकाने स्वतःहून प्रश्नांची उत्तर देऊ नयेत. असे कोणतेही वर्तन आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

(७) उमेदवारांना दिलेला भरपाईचा वेळ संगणक प्रणालीवर आधारित असल्याने ज्या उमेदवारांनी अर्ज करताना लेखनिकाची सेवा घेणार असल्याचे नमूद केलेले आहे अशा नोंदणीकृत उमेदवारांनाच अतिरिक्त वेळ देण्यात येईल. भरपाईच्या वेळेसाठी नोंदणीकृत नसलेल्या अन्य उमेदवारांना ऐनवेळी अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.

(८) परीक्षेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षा संपन्न झाल्यानंतरही जर परीक्षेदरम्यान लेखनिकाच्या सेवांचा स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी वापर केल्याचे परीक्षा प्रशासनास आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल,

(९) **अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना:-** अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात (किमान ४०% दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांनी आवेदन पत्रामध्ये तसे नमूद केलेले असल्यास त्यांना प्रति तास २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल.

(१०) **दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना:-** दृष्टिहीन (ज्यांना ४०% अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्य आहे) उमेदवार परीक्षेसाठी मॅग्निफाइड फॉन्ट ची सुविधा उपलब्ध करण्याचा पर्याय घेऊ शकतात. तसेच अशा उमेदवारांना भरपाई म्हणून दर तासासाठी अतिरिक्त २० मिनिटे देण्यात येतील.

(११) सदरची मार्गदर्शक तत्त्वे केंद्र / महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या सूचनांनुसार / निर्णयानुसार असून त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने बदल केल्यास ते बदल लागू राहतील.

**१७. अयोग्य वर्तन / अयोग्य माध्यमांचा वापर केल्याबद्दल दोषी आढळलेल्या उमेदवारांविरुद्ध कारवाई:-** उमेदवारांना सूचित केले जाते की त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना कोणतेही खोटे, छेडछाड केलेले किंवा बनावट तपशील सादर करू नयेत आणि कोणतीही महत्त्वाची माहिती लपवू नये. परीक्षेच्या वेळी किंवा त्यानंतरच्या निवड प्रक्रियेत, उमेदवार खालील बाबतीत दोषी असल्यास किंवा आढळून आल्यास असा उमेदवार त्याविरुद्ध फौजदारी खटला भरणे यासोबतच ज्या परीक्षेसाठी तो उमेदवार आहे, त्या परीक्षेसाठी अपात्र ठरविणे तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग व राज्य शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी कायमस्वरूपी किंवा विशिष्ट कालावधीसाठी अपात्र ठरविणे किंवा त्याच्या सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(१) अयोग्य मार्गाचा अवलंब करणे,

(२) तोतयागिरी करणे किंवा कोणत्याही व्यक्तीद्वारे तोतयागिरी करून घेणे,

(३) परीक्षा हॉलमध्ये गैरवर्तन करणे किंवा चाचणीची सामग्री किंवा त्यातील इतर कोणतीही माहिती कोणत्याही स्वरुपात तोंडी किंवा लेखी, इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिकरित्या कोणत्याही उद्देशाने उघड करणे, प्रकाशित करणे, पुनरुत्पादन करणे, प्रसारित करणे, संग्रहित करणे किंवा प्रसारित करणेसाठी सुलभ करणे,

(४) त्याच्या / तिच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही अनियमित किंवा अयोग्य मार्गाचा अवलंब करणे, किंवा

(५) अयोग्य मार्गाने त्याच्या / तिच्या उमेदवारीसाठी समर्थन मिळवणे, किंवा

(६) परीक्षा / मुलाखत हॉलमध्ये मोबाईल फोन किंवा संवादाची तत्सम इलेक्ट्रॉनिक, स्मार्ट वॉच ई. उपकरणे बाळगणे.

(७) कॉपी करणे, डमी उमेदवार बसविण्याचा प्रयत्न करणे.

**१८. उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सूचना :**

(१) परीक्षा केंद्राचा पत्ता प्रवेश पत्रावर नमूद करण्यात येईल. परीक्षेचे केंद्र / स्थळ/ दिनांक/वेळ बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

(२) परीक्षा प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेनंतर परीक्षा केंद्रावर उपस्थित होणा-या उमेदवारांना परीक्षेला बसू देण्याची परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेचा कालावधी जरी ९० मिनिटाचा असेल तरी सुध्दा उमेदवाराना परीक्षा

केंद्रावरील विहीत प्रक्रिया (उमेदवाराना महत्वाच्या सूचना देणे. उमेदवाराची व कागदपत्राची पडताळणी करणे, आवश्यक कागदपत्र जमा करणे लॉग इन करणे) पार पाडण्यासाठी उमेदवारांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी किमान २ तास परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.

(३) उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकीची, अपूर्ण अथवा खोटी आढळून आल्यास उमेदवाराची संबंधित पदासाठीची उमेदवारी रद्द करण्यात येईल व संबंधित उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना / नोटीस अथवा कारण न देता उमेदवार तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील. त्यामुळे होणा-या सर्व परिणामास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

(४) ओळख पटविणे परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पैन कार्ड/पारपत्र / वाहनचालक परवाना/ मतदार ओळखपत्र/फोटो सहित आधारकार्ड/बँकेचे फोटो सहीतचे पासबुक / महाविद्यालयाचे विद्यापीठाचे अलिकडील मैच ओळखपत्र /कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहित असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख ही उमेदवाराचे प्रवेशपत्र हजेरीपत्रक/उपस्थितीपत्रक त्याने सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

(५) **रेशनकार्ड व तात्पुरता वाहन परवाना परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.**

**टिप:-** उपरोक्त परीक्षेला उपस्थित रहातांना उमेदवाराने स्वतःची ओळख पटविण्यासाठीची उपरोक्त नमूदपैकी आवश्यक त मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायाकीत प्रती, परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवाराचे परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील आणि सादर केलेल्या ओळखपत्रावरील नांव आवेदनपत्रात नोंदणी केल्यानुसार तंतोतंत जुळणे आवश्यक राहील. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या मधल्या शेवटच्या नावांत विवाहानंतर बदल झाला असल्यास त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबातचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्रतिज्ञापत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रासह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित रहाणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

१. परीक्षेसाठी वैध प्रवेशपत्र

२. मूळ फोटो ओळखपत्र

३. फोटो ओळखपत्राची छायाप्रत

(६) ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वतः जबाबदार राहील त्यास निवडसमिती कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

**टीप:-** उमेदवारांना परीक्षेला उपस्थित असताना परीक्षेच्या प्रवेशपत्रासह ओळखपत्राच्या पुराव्याची छायांकित प्रत सादर करावे लागेल, त्याशिवाय त्यांना परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. परीक्षार्थी उमेदवारांनी लक्षात ठेवावे की प्रवेशपत्रावर दिसणारे नाव नोंदणी प्रक्रिये दरम्यान दिलेले ओळखपत्रावर दिसत असलेल्या नावाशी तंतोतंत जुळले पाहिजे. विवाहानंतर नाव / आडनाव / मध्यम नाव बदललेल्या महिला उमेदवारांनी याची विशेष नोंद घ्यावी. प्रवेश पत्र आणि ओळखपत्रामध्ये दर्शविलेले नाव यामध्ये साम्य न आढळल्यास उमेदवाराला परीक्षेला बसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले आहे त्यांच्या बाबतीत, त्यांनी नाव बदलाबाबतचा पुरावा सादर केला तरच परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाईल.

**१९. इतर अटी :-**

(१) परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही ज्यामुळे ऑनलाईन चाचणी वितरणावर तसेच निकालावर परिणाम होऊ शकतो. अशावेळी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी

प्रयत्न केले जातील. तथापि यामध्ये उमेदवारांची हालचाल, व परीक्षेला विलंब होणे यासारख्या बाबी गृहीत धरण्यात आलेल्या आहेत. परीक्षेचे फेर आयोजन हे समितीच्या / परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थेच्या पूर्ण निर्णयावर अवलंबून राहील. परीक्षेच्या फेर आयोजनासाठी उमेदवारांचा कोणताही दावा राहणार नाही. चाचणी वितरणाची विलंबित प्रक्रिया न स्वीकारणारे, हालचालींस नकार देणारे किंवा अशा प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक नसलेले उमेदवार सरसकटपणे निवड प्रक्रियेतून बाद ठरविले जातील.

(२) परीक्षेशी संबंधित सर्व बाबींमध्ये समितीचा निर्णय अंतिम असेल आणि तो उमेदवारावर बंधनकारक असेल. या संदर्भात समितीद्वारे कोणताही पत्रव्यवहार किंवा वैयक्तिक चौकशी केली जाणार नाही.

(३) परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये घेतल्यास, विविध सत्रांमधील वापरल्या जाणाऱ्या चाचणीमधील अडचण पातळी विचारात घेऊन विविध सत्रांमधील गुण समायोजित करून समतुल्य करण्यात येतील. परीक्षा केंद्राची / परीक्षा केंद्रावरील नोडची (Node) क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवारासाठी काही तांत्रिक व्यत्यय आल्यास अशा केंद्रावर एकापेक्षा जास्त सत्रे आयोजीत केली जाऊ शकतात.

(४) निवडसमिती उमेदवारांच्या वैयक्तिक प्रतिसादांचे (उत्तरे) विश्लेषण इतर उमेदवारांच्या प्रतीसादांशी अचूक आणि चुकीच्या उत्तरांच्या समानतेचे नमुने शोधण्यासाठी करेल. यासंदर्भात विभागाद्वारे अवलंबलेल्या विश्लेषणात्मक प्रक्रियेत, उमेदवारांनी उत्तरे एकमेकांसोबत वाटप (Share) केलेली आहेत आणि त्यांना मिळालेले गुण खरे / वैध नाहीत असा निष्कर्ष निघाल्यास समिती अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवते तसेच अशा उमेदवारांचे निकाल रोखले जातील.

(५) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे किंवा उमेदवारांकडून निवड प्रक्रियेचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास उमेदवार निवड प्रक्रियेतून अपात्र ठरेल आणि त्याला / तिला यापुढे कोणत्याही निवड प्रक्रियेमध्ये भाग घेण्यास प्रतिबंध करण्यात येईल.

**२०. गुण पद्धती :-** खालील पद्धतीचा अवलंब करून ऑनलाईन परीक्षेचे गुण ठरविले जातात:

(१) वस्तुनिष्ठ चाचणीमध्ये प्रत्येक उमेदवाराने अचूक उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या अंतिम गुणांसाठी विचारात घेतले जातील.

(२) परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये घेण्यात आलेली असल्यास वरीलप्रमाणे उमेदवाराने संपादित केलेले अंतिम गुण विविध सत्रांमधील वापरल्या जाणाऱ्या चाचणीमधील अडचण पातळी विचारात घेऊन विविध सत्रांमधील गुण समायोजित करून समतुल्य करण्यात येतील.

**२१. निवडीचे निकष :** जाहिरातीत नमूद विविध पदांवरील नियुक्त्या या सदरच्या परीक्षेच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या (Merit List) आधारे निवड करून करण्यात येतील. परीक्षेद्वारे निवडीसाठी आवश्यक किमान गुण व परीक्षेमध्ये उमेदवारांना समान गुण मिळाल्यास गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.४ मे २०२२ मधील तरतुदीनुसार राहील.

**२२. उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यासाठी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशील :**

(१) परीक्षेसाठी केलेल्या ऑनलाईन आवेदन पत्राची छायांकित प्रत.

(२) शैक्षणिक व अनुभवाच्या अर्हतेबाबतची कागदपत्रे

(३) संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

(४) परीक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत.

(५) अर्जात नमूद केलेप्रमाणे जात प्रमाणपत्र/जात वैधत प्रमाणपत्र / नॉन क्रिमीलेअर / इतर आवश्यक प्रमाणपत्र.

**२३ सेवाप्रवेशोत्तर शर्ती:-**ज्या पदांकरिता प्रचलित नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परीक्षा विहीत केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परीक्षा.

**(एक)** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

**(दोन)** शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.), क्रमांक: मातंसं-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, क्रमांक मातंसं- २०१२/प्रक्र.२७७/३९, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व १६ जुलै, २०२१ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने यासंदर्भात वेळोवेळ विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

**(तीन)** उपरोक्त अर्हतेव्यतिरिक्त उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(चार) उपरोक्त पदांवर निवड झालेले उमेदवार हे महाराष्ट्रात कोठेही बदलीस पात्र असतील.

२४. सदर जाहिरात पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या 1) https://mahaarchaeology.in/ 2) http://www.maharashtra-archives.org 3) https://www.mahasanskruti.org/ 4) https://www.mahasahitya.org/ 5) www.gazetteers.maharashtra.gov.in 6) http://mahagazetteers.com या संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

स्थळ:-मुंबई

दिनांक - १५/०८/२०२३

स्वा/-

(डॉ. तेजस म.गर्गे).

राज्यस्तरीय निवड समिती, मुंबई

परिशिष्ट-अ

महाराष्ट्र शासनाच्या, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या विविध कार्यालयातील पदभरतीकरीता मराठी/इंग्रजी माध्यमातुन संगणक आधारीत (Computer Based online examination) परीक्षांसाठी कार्यालय/विभागनिहाय पदांच्या अभ्यासक्रमाचे तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अभ्यासक्रम व विषयनिहाय गुणांचे तपशिल | | | | | कार्यालयनिहाय पदांचे तपशिल नाव | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई | पुराभिलेख संचालनालय, मुंबई | सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई | दर्शनिका विभाग, मुंबई | महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती साहित्य अकादमी, मुंबई |
| अ.क्र. | अभ्यासक्रम/विषय | गुण | प्रश्न संख्या | परीक्षेचा स्तर | | | | | |
| १ | **मराठी** | ५० | २५ | पदवी | (१) सहाय्यक अधिक्षक (गट-क)<br>(२) मार्गदर्शक व्याख्याता (गट-क) | (१) अभिलेख परिचर (गट-क)<br>(२) तंत्रज्ञ मदतनीस (गट-क) | (१) अधिक्षक गट-ब (अराजपत्रित)<br>(२) सहायक गट-क | ---------- | (१) टिप्पणी सहायक (गट-क) |
| | **इंग्रजी** | ५० | २५ | | | | | | |
| | सामान्य ज्ञान | ५० | २५ | | | | | | |
| | बौद्धीक चाचणी | ५० | २५ | | | | | | |
| | | | | | | | | | |
| २ | **मराठी** | ३० | १५ | पदविका | (३) जतन सहाय्यक (गट-क)<br>(४) उप आवेक्षक (गट-क)<br>(५) कनिष्ठ अभियंता (गट-क) | ---------- | ---------- | ---------- | ---------- |
| | **इंग्रजी** | ३० | १५ | | | | | | |
| | सामान्य ज्ञान | ३० | १५ | | | | | | |
| | बौद्धीक चाचणी | ३० | १५ | | | | | | |
| | स्थापत्य अभियांत्रिकी पदविकेचा अभ्यासक्रम | ८० | ४० | | | | | | |
| | | | | | | | | | |
| ३ | **मराठी** | ३० | १५ | पदव्युत्तर पदवी | (६) तंत्र सहाय्यक (गट-क) | ---------- | ---------- | ---------- | ---------- |
| | **इंग्रजी** | ३० | १५ | | | | | | |
| | सामान्य ज्ञान | ३० | १५ | | | | | | |
| | बौद्धीक चाचणी | ३० | १५ | | | | | | |
| | प्राचिन भारतीय इतिहास किंवा संस्कृती/मध्ययुगीन भारतीय इतिहास या विषयातील पदव्युत्तर पदवीचा अभ्यासक्रम | ८० | ४० | | | | | | |
| | | | | | | | | | |
| ४ | **मराठी** | ३० | १५ | | (७) छायाचित्रचालक | (३) सहाय्यक छाया | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **इंग्रजी** | ३० | १५ | पदविका | (गट-क) | चित्रकार (गट-क) | ---------- | ---------- | ---------- |
| | सामान्य ज्ञान | ३० | १५ | | | | | | |
| | बौद्धीक चाचणी | ३० | १५ | | | | | | |
| | छायाचित्रण विषयक प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि मुद्रण/विकास | ८० | ४० | | | | | | |
| | | | | | | | | | |
| ५ | **मराठी** | ३० | १५ | पदवी | ---------- | (४) फार्शीज्ञात संकलक (गट-क) | ---------- | ---------- | ---------- |
| | **इंग्रजी** | ३० | १५ | | | | | | |
| | सामान्य ज्ञान | ३० | १५ | | | | | | |
| | बौद्धीक चाचणी | ३० | १५ | | | | | | |
| | फारसी भाषेच्या पदवीचा अभ्यासक्रम | ८० | ४० | | | | | | |
| | | | | | | | | | |
| ६ | **मराठी** | ३० | १५ | पदवी | ---------- | (५) रसायनशास्त्रज्ञ (गट-क) | ---------- | ---------- | ---------- |
| | **इंग्रजी** | ३० | १५ | | | | | | |
| | सामान्य ज्ञान | ३० | १५ | | | | | | |
| | बौद्धीक चाचणी | ३० | १५ | | | | | | |
| | रसायनशास्त्र पदवीचा अभ्यासक्रम | ८० | ४० | | | | | | |
| | | | | | | | | | |
| ७ | **मराठी** | ३० | १५ | पदविका | | (६) ग्रंथपाल लिपिक-नि-भांडारपाल (गट-क) | ---------- | ---------- | ---------- |
| | **इंग्रजी** | ३० | १५ | | | | | | |
| | सामान्य ज्ञान | ३० | १५ | | | | | | |
| | बौद्धीक चाचणी | ३० | १५ | | ---------- | | ---------- | ---------- | ---------- |
| | ग्रंथपाल शास्त्र पदविका अभ्यासक्रम | ८० | ४० | | | | | | |
| | | | | | | | | | |
| ८ | **मराठी** | ३० | १५ | | | | | (१) सहायक संशोधन अधिकारी गट-ब | |
| | **इंग्रजी** | ३० | १५ | | | | | | |
| | सामान्य ज्ञान | ३० | १५ | | | | | | |
| | बौद्धीक चाचणी | ३० | १५ | | ---------- | ---------- | ---------- | | ---------- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अर्थशास्त्र/इतिहास/समाजशास्त्र या विषयातील पदवीचा अभ्यासक्रम | ८० | ४० | पदवी | | | | (अराजपत्रित)<br>(२) सहायक (गट-क) | |
| | | | | | | | | | |
| ९ | **मराठी** | ३० | १५ | पदवी | ---------- | (७) अभिलेखाधिकारी (गट-ब अराजपत्रित)<br>(८) संशोधन सहाय्यक (गट-क)<br>(९) संकलक (गट-क) | ---------- | ---------- | ---------- |
| | **इंग्रजी** | ३० | १५ | | | | | | |
| | सामान्य ज्ञान | ३० | १५ | | | | | | |
| | बौद्धीक चाचणी | ३० | १५ | | | | | | |
| | आधुनिक भारताचा इतिहास या विषयातील पदवीचा अभ्यासक्रम | ८० | ४० | | | | | | |